# कायम विनाअनुदानित तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

महाराष्ट्र शासन

क्रमांक : नमाशा २००६/(१५३८/०६)/माशि
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन
मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ मे, २००६

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर/कोल्हापूर.

विषय : २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत...

संदर्भ : शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७ मे, २००३.

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन सोबत जोडलेल्या सहपत्रातील एकूण ४४५ शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे:-

१) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मंजुरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३) शासन निर्णय दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपद्धती संस्थेवर बंधनकारक राहतील.

४) संस्थेच्या अध्यक्षांकडून कायम विनाअनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

५) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

६) "कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा" असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

THE ORCHID SCHOOL PUNE BANER

७) सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिकाऱ्यांशी/ शासनाशी पत्रव्यवहार करताना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

८) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) काटेकोरणपणे पालन करणे आवश्यक आहे.

९) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा विद्यार्थ्यांच्या फीच्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावेत.

३. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

३) "कायम विनाअनुदान" तत्वावरील शाळांच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांनी घ्यावी.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यांत यावी. तसेच सदर माध्यमिक शाळेस परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

६. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१७१७२९०१००१ असा आहे.

(न.ग.तडवी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत - माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.
मा.शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांचे खाजगी सचिव.
मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
निवड नस्ती (माशि १)

शासन पत्र क्रमांक : नमाशा २००६/(१५८/०६)/माशि १, दिनांक १६ मे, २००६ चे सहपत्र.

कायम विनाअनुदान तत्वावरील नवीन माध्यमिक शाळा

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | इयत्ता |
|---|---|---|---|
| | औरंगाबाद | हर्सुलरोड, औरंगाबाद | |
| जिल्हा - औरंगाबाद | | | माध्यम - उर्दू |
| १८२ | अमर ज्योति शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद | हर्सुल, ता.औरंगाबाद | ८ वी |
| १८३ | लोकहित शिक्षण प्रसारक मंडळ, जुना बाजार, औरंगाबाद | वलदगांव पंढरपूर, ता.औरंगाबाद | ८ वी |
| १८४ | ऑल सिस्टर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, औरंगाबाद | पुष्पक गार्डन, चिकलठाणा, औरंगाबाद | ८ वी |
| १८५ | हाजी सलाऊद्दीन अहेमद एज्यु.ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, गणेशकॉलनी, औरंगाबाद | न्याय नगर, हुसेन कॉलनी, गारखेडा परिसर, औरंगाबाद | ८ वी |
| १८६ | ऑल सिस्टर एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, औरंगाबाद | कटकट गेट, औरंगाबाद | ८ वी |
| जिल्हा- पुणे | | | माध्यम - मराठी |
| १८७ | श्री.सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, सोनेगिरी, ता.परांडा, जि.उस्मानाबाद | नाणे, ता.मावळ | ८ वी |
| १८८ | कै.विठ्ठलराव बेंलदरे ज्ञानप्रसारक संस्था, आंबेगाव बु.ता.हवेली | आंबेगाव बु.ता.हवेली | ८ वी |
| १८९ | कर्तव्य प्रतिष्ठान बावधन ता.मुळशी, जि.पुणे | बावधन, पुणे | ८ वी |
| १९० | कै.अनंतराव पवार ग्रामविकास प्रतिष्ठान, निमगाव, ता.इंदापूर | निमगाव, ता.इंदापूर | ८ वी |
| १९१ | चिंतामणी ज्ञानपीठ धनकवडी, पुणे | धनकवडी, आंबेगाव | ८ वी |
| १९२ | नंदिकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, दगडवाडी, ता.इंदापूर | दगडवाडी, इंदापूर | ८ वी |
| जिल्हा - पुणे | | | माध्यम - इंग्रजी |
| १९३ | ग्लोबल इन्क्वेटिक इंडिया, पुणे २ | शुक्रवार पेठ, पुणे | ८ वी |
| १९४ | रोझरी ए.सो.आंबेडकर रोड, पुणे | विमाननगर | ८ वी |
| १९५ | निनाददेवी शिक्षण संस्था, पुणे-४६ | धनकवाडी, पुणे | ८ वी |
| १९६ | सुभद्रा ए.सो.महाराष्ट्र हौ.बोर्ड येरवडा, पुणे ६ | मोरवाडी पिंपरी | ८ वी |
| १९७ | प्रज्ञा निकेतन ए.सौ.कोथरुड, पुणे | बाणेर, पुणे | ८ वी |
| १९८ | अभिनव शिक्षण प्रसारक संस्था बालाजी पार्क बाणेर, पुणे | बाणेर, पुणे | ८ वी |
| १९९ | बी.डी.एस.सी.ए.सो.कसबा पेठ, पुणे | कसबा पेठ, पुणे | ८ वी |
| २०० | समर्थ ज्ञानपीट सोमेश्वरनगर, ता.बारामती | जेजुरी, ता.पुरंदर | ८ वी |
| २०१ | त्रिमुर्ती शिक्षण संस्था, कर्वेनगर, पुणे | वाघोली, ता.हवेली | ८ वी |
| २०२ | राजश्री शाहू मेमोसोजवाहर नगर विद्यापीठ रोड, पुणे | पिंपळेगुरव, पुणे | ८ वी |



Dhmaykar

10

231

GOVERNMENT OF MAHARASHTRA

No. NOC 4003/(741/2003)SE-1
School Education and Sports Department
Mantralaya annexe, Mumbai 400 032

Dated 05/02/2005

To,

The Secretary,
Central Board of Secondary Education,
Community Centre, Preet Vihar,
New Delhi

Subject : Issue of No Objection Certificate.

Sir,

Government of Maharashtra has No Objection for starting a school in C.B.S.E. section at Baner, Dist. Pune, run by Pradnya Niketan Education Society, Baner Mhalunge Road, S.No. 80/1/2/1, Near Signet Corner, Baner, Pune 411045, affiliate to the Central Board of Secondary Education, on the conditions that the school shall abide by the rules and regulations stipulated in that behalf by the State Government.

Yours faithfully,

Guttemani

( M. A. GUTTE )
Under Secretary
Government of Maharashtra

Copy to :

1. The Director of Education, (Secondary and Higher Secondary Education) *Maharashtra State, Pune*
2. The Regional Deputy Director of Education, Pune
3. Education Officer (Secondary), Z.P, Pune.,
4. The Secretary, Pradnya Niketan Education Society, Baner Mhalunge Road, S. No. 80/1/2/1, Near Signet Corner, Baner, Pune 411045.
5. Select file SE-1

Sangeeta

E:\SHALEY~1\se-1\noc 741 31.10.doc

Sangeeta

THE ORCHID ... PUNE

महाराष्ट्र शासन

क्र. नमाशा २००९/(१९४/०९)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक :- २४ फेब्रुवारी २००९.

प्रति,

संचालक,
द ऑर्कीड स्कूल,
पुणे.

विषय : कायम विनाअनुदानित मान्यताप्राप्त शाळेत इ. ५ वी व ६ वीच्या वर्गास परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :- आपले दि. २८.१.२००९ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदरहू पत्रासोबत आपण सादर केलेल्या सहपत्रांमध्ये प्राथमिक शाळा परवानगी आदेश व शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र हे आदेश सादर केलेले आहेत. सी.बी.एस.इ. संलग्नित शाळांना शासनाचे केवळ ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येते व या अभ्यासक्रमाशी संलग्नित शाळांचे वर्ग प्रीप्रायमरी ते इ. सहावी एकाच वर्षी सुरु केले जाऊ शकतात. या संदर्भातील उल्लेख सीबीएसई - बायलॉजमध्ये करण्यात आलेला आहे. आपणाद्वारे संचलित शाळेमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम चालविण्यात येत असेल तर या शाळेस शासनाच्या वेगळ्या परवानगी आदेशाची आवश्यकता नाही. तसेच इ.५ वी ते ६ वीच्या वर्गांनादेखील शासन किंवा क्षेत्रीय अधिका-यांच्या परवानगीची गरज नाही. तथापि राज्य मंडळ- बालभारती अभ्यासक्रम जर प्राथमिक शाळेत शिकविला जात असेल तर इ.५ वी ते ७ वीचे वर्ग जोडण्यासंदर्भातील परवानगी देण्याचे अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना आहेत.

आपली विश्वासू,

(स्वाक्षरी)

( डॉ. सुवर्णा सि.खरात)

प्रत-
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.